**साक्षीदार क्र. ३**

**मी याव्दारे प्रतिज्ञेपुर्वक निवेदन करतो की,**

**नाव : सोमनाथ गोपीनाथ शिंदे,**

**वय : ५९ वर्ष, धंदा: मजुरी ,**

**रा. सुकेवाडी, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर**

**साक्षीदाराचा सरतपास सरकारी विधिज्ञ श्री. आर. के. शिंदे यांचेमार्फत सुरु :**

मी व संदीप बडे असे मिळुन ट्रकवर अनुक्रमे क्लिनर व चालक असे म्हणुन होतो. आमच्या ट्रकचा क्रमांक एम.एच.१७ बी. डी. ६१८३ असा होता. आम्ही दुध घेवुन ट्रॅंकर खाली करण्यासाठी संगमनेर ते नांदेड जात होता. समोरुन येणा-या ट्रक क्रमांक एम.एच. १७ बी.डी. ८१८१ या चौदा चाकी टॅंकरला वेग आवरला नाही व त्याने आमच्या ट्रकला समोरुन धडक दिली. तसेच एम.एच. १७ बी.डी. ८१८१ हा ट्रक नागमोडी वेगाने आमच्याकडे आला. सदर धडकेमुळे आमचा ट्रक घोडेगाव ग्रामपंचायतीच्या विहीरीजवळ पलटी झाला. त्यामुळे आम्हाला दुखापत झाली. संदीप बडे याला डोक्याला, हाता-पायाला मार लागला. मला कंबरेला व मांड्याला मुका मार लागुन सुज आली. सदर धडकेमुळे आमचे केबिन पुर्ण दबल्या गेले, चेसीस बेंड झाली व मागिल डबबा दबल्या गेला व दुधाचे नुकसान झाले. तेथील लोकांनी आम्हाला घोडेगाव येथील ग्रामीण रुग्णालयात नेले, त्याठिकाणी आम्हाला उपचार देवुन आमच्या नातेवाईकांनी संगमनेर येथे पुढील उपचाराकामी शेळके हॉस्पीटल येथे नेले. सदरची घटना दि. २६/०६/२०२४ रोजी सांयकाळी साडेचार वाजता घ ाडली. दुस-या दिवशी दि. २७/०६/२०२४ रोजी मी सोनई पोलिस स्टेशन येथे फिर्याद दाखल केली. आता मला सदरील फिर्याद दाखविण्यात आली. ती तीच असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. सबब, फिर्यादीस **निशाणी २२** देण्यात येते. धडक देणारी गाडी कोण चालवित होते हे मला माहिती नाही. तसेच धडक देणा-या व्यक्तीबद्दल मला माहिती मिळाली नाही. मला धडक देणा-या व्यक्तीची माहिती न कळण्याचे कारण म्हणजे मी संगमनेर येथील रहिवाशी आहे व मी दवाखान्यात होतो. धडक देणारा व्यक्ती घटनेच्या वेळी मी पाहिला नाही कारण त्याच्या तोंडाला रुमाल बांधलेला होता. मी धडक देणारा गाडी क्रमांक पाहिला व उपचार कामी गेलो.

**सरतपास पुर्ण,**

**उलटतपास आरोपी तर्फे विधिज्ञ ॲड. श्री. ए. टी. आगळे यांचे मार्फत नाकारला.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृती,

PRANITA RITESH SUGAONKAR

Digitally signed by PRANITA RITESH SUGAONKAR
Date: 2026.01.27 05:44:45 +0530

दिनांक :- २७/०१/२०२६

(डॉ. पी. आर. सुगांवकर)
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.१, नेवासा.